दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ३ रे अंक १९६ वा मंगळवार दि.२ जानेवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## शिवसेनेचे ज्येष्ठ कार्यकर्ते पठाण चांद शेख यांचा अभिष्टचिंतन सोहळा जल्लोष साजरा.



मुंबई / शहामत शेख :- दामू नगर कांदिवली विभागातील शिवसेनेचे ज्येष्ठ कार्यकर्ते व शाखा समन्वयक व समाजसेवक पठाण चांद शेख यांचा ३१डिसेंबर रोजी वाढदिवस अती उत्साहात साजरा करण्यात आला . सन १९९० पासून शिवसेनेचे कार्यकर्ते म्हणून नावा रूपाला आले. त्या काळात अनेक सामाजिक प्रश्नावर त्यांनी भर दिला. सामाजिक व राजकीय तत्त्वाचा जडणघडण असलेला कार्यकर्ता म्हणून शेख यांची उत्तर मुंबईत ओळख आहे. तसेच सध्याचे खासदार गजानन कीर्तिकर व मुंबईचे माजी महापौर व सध्याचे आमदार सुनील प्रभू यांच्या अत्यंत जवळचे विश्वासू मानले जातात. या स्थानिक लोकप्रतिनिधीच्या माध्यमातून समाजातील असंख्य प्रश्न मार्गी लावले. दामू नगर बहुसंख्य भाग झोपडपट्टीचा आहे. या भागात अनेक प्रश्न मार्गी लावत समाजात आपली एक वेगळी ओळख निर्माण केली. शिवसेनेत मोर्चे,आंदोलन सभा पठाण शेख आघाडीचा म्हणून चेहरा गणला जातो. शिवसेना पक्षात अनेक कालावधी पासून एकनिष्ठ व कट्टर शिवसैनिक म्हणुन ओळखले जातात. सध्या शिवसेनेत (उबाठा) गटात शाखा समन्वय या पदावर कार्यरत आहे .यांच्या वाढदिवसानिमित्त विभागातून वेगवेगळ्या ठिकाणी शुभेच्छा वर्षावचे बॅनर्स झळकताना दिसले, तसेच या अभीष्टचिंतन सोहळा निमित्त विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर व कार्यकर्ते सामाजिक संस्थेतील पदाधिकारी व स्थानिक मंडळाचे कार्यकर्ते आवर्जून उपस्थित राहून भावी वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या. हा अभिष्टचिंतन सोहळा विभागात जल्लोष साजरा करण्यात आला.

## भारतीय धम्म महासंघ, बीड द्वारा ३३ वा रविवार बुद्ध वंदना व मंगल मैत्री प्रार्थना कार्यक्रम संपन्न.





बीड / प्रतिनिधी :- भारतीय धम्म महासंघ बीड द्वारा ३३ वा रविवार दि. ३१.१२.२०२३ रोजी बुद्ध वंदना, २२ प्रतिज्ञा व भारतीय संविधान उद्देशिका वाचन कार्यक्रम आयु सुभाष दशरथ लोणके, डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया, बीड जिल्हा अध्यक्ष, सह्याद्री ग्यारेजच्या पाठीमागे धानोरा रोड बीड येथील निवासस्थानी अत्यंत मंगलमय वातावरणात घेण्यात आला. सदरील कार्यक्रमात सामुहिक बूध्द वंदना, २२ प्रतिज्ञा, मंगल मैत्री प्रार्थना व भारतीय संविधान उद्देशिका वाचन घेण्यांत आले. तत्पूर्वी आयु सुभाष लोणके साहेब आणि आयुष्मती लता सुभाष लोणके यांनी अगरबत्ती मोमबत्ती प्रज्वलित करून तथागत गौतम बुद्ध व सम्राट अशोक, डॉ बाबासाहेब आंबेडकर, यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन केले. कार्यक्रमास उपस्थित असलेले डॉ अशोक मजमुले साहेब, राजाराम जाधव व सुभाष लोणके साहेब यांचें वडील यांचा पुष्पहार देऊन स्वागत केले. उपस्थित सर्व उपासक आणि उपासिका यांच्यात सामुहिक बूध्द वंदना झाली. त्यानंतर प्रस्तुत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व २२ प्रतिज्ञा वाचन आयु अडव्होकेट चंद्रवदन जाधव यांनी केले. संविधान उद्देशिका वाचन आयु राजेंद्र गालफाडे यांनी केले. तसेच मंगल मैत्री प्रार्थना आयु दत्ता कसबे यांनी घेतली. प्रस्तुत कार्यक्रमात सुभाष लोणके साहेब यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, हा स्तुत्य उपक्रम आहे. बुद्ध वंदनेचा हा कार्यक्रम गाव खेडया पर्यंत पोहोचविण्यासाठी डीपीआय कार्येकर्ते तन मन धनाने सहकार्य करतील. त्यांनी मनोगत व्यक्त करताना पुढें असे ही म्हणाले की समाजातील कार्यरत व सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी यांच्या सहकार्याने भविष्यात एखादा मोठा समाजहिताचा प्रकल्प सुध्दा राबवता येईल. प्रस्तुत कार्यक्रमात बी आर गायकवाड, साळवे एस एन, आयु त्रिशला मनोहर राऊत आणि एस एम जोगदंड यांनी समयोचित मनोगत व्यक्त केले. उपस्थित सर्व उपासक उपासिका यांचे आभार सुभाष लोणके साहेब यांनी मानले. कार्यक्रमाचे शेवटी शरणत्तय होवून कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमात आयु बी एम जोगदंड, सुनिता भिवाजी जोगदंड, मयुरा दत्ता कसबे, प्रा आनिता कसबे, बाळासाहेब पौळ, राजाराम जाधव, डॉ अशोक मजमुले साहेब, दशरथ लोणके, सतीष कापसे, अशोक प्रभू मोमीन यांनी सहभाग नोंदवला.

## अंबरनाथ येथे ऑन लाईन लॉटरीच्या अड्ड्यावर पोलिसांचा छापा ९ जणाना घेतले ताब्यात

उल्हासनगर / प्रतिनिधी : उल्हासनगर , अंबरनाथ , कल्याण या ठिकाणी ऑनलाईन लॉटरीचा जुगार जोरात सुरु असुन हा जुगार नागरिकांच्या अज्ञानाचा फायदा घेवुन संदिप गायकवाड व ललित पटेल हे दोन जुगार माफीया चालवत असुन यांच्या अंबरनाथ येथील ऑनलाईन लॉटरीच्या जुगार अड्ड्यावर मानपाडा पोलिसानी धाड मारुन ९२ हजार रुपयाचा माल हस्तगत केला आहे. एकुण १३ जणावर गुन्हा दाखल केला आहे , तर ९ जणाना ताब्यात घेतले आहे. उल्हासनगर येथील मटका किंग संदिप गायकवाड यांच्या जुगाराचे व ऑनलाईन लॉटरीचे जाळे कल्याण उल्हासनगर , अंबरनाथ शहरात पसरले असुन याला डोंबिवलीचा ललित पटेल हा जुगार माफिया साथ देत आहे. यांचा अंबरनाथ पुर्व येथील माहुली आर्केड इमारतीच्या तळमजला येथे स्किल गेम राजश्री केनो या नावाने ऑनलाईन लॉटरीचा जुगार शासकीय परवाना नसताना सुरु असल्याची माहीती मानपाडा डोंबिवली पोलिसाना मिळाली, तेव्हा सदर अड्ड्यावर छापा मारला असता, त्या ठिकाणी ऑनलाईन लॉटरीचा जुगार सुरु असल्याचे दिसुन आले. हे जुगारी नागरिकांच्या अज्ञानाचा फायदा घेवुन अनधिकृत लॉटरी जुगार चालवत होते. तेव्हा पोलिसानी जुगार माफिया संदिप गायकवाड व ललित पटेल यांच्या सह एकुण १३ जणावर गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान संदिप गायकवाड व ललित पटेल यांनी हा लॉटरी जुगार चालवन्यासाठी जागा व साहित्य उपलब्ध करुन दिले असुन मारुती हरड यांच्या संगनमताने हा ऑन लाईन लॉटरी जुगार सुरु असल्याचे पोलिसानी सांगितले आहे. तर जुगार खेळवुन घेणाऱ्या ९ जणाना पोलिसानी ताब्यात घेतले आहे . यातील प्रमुख आरोपी संदिप गायकवाड हे राष्ट्रवादीचे पदाधिकारी असुन याच पदाचा फायदा घेत हा तीन ही शहरात ऑनलाईन लॉटरी , मटका जुगार चालवुन गोरगरींबाचे आयुष्य उध्दवस्त करत आहे. याच मटक्याच्या धंद्यातुन गायकवाड यांच्यावर गोळीबार झाला होता. तर मानपाडा पोलिस ठाण्याचे पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक प्रशांत आवाजी यांच्या फिर्यादीवरुन शिवाजी नगर पोलिस ठाण्यात कलम ४२० , ३४ सह माहीती तंत्रज्ञान अधिनियम २००० कलम ६६ लॉटरी अधिनियम १९९८ कलम ४,७ (३) नुसार गुन्हा दाखल झाला असुन या गुंह्याचा तपास पोलिस निरीक्षक ( गुन्हे ) चोपडे हे करत आहेत.

## भीमा कोरेगाव येथील रणसंग्रामात शहीद झालेल्या ५०० शूर वीरांना प्रा. महेंद्र आल्टे यांनी केले अभिवादन




लातूर:-भीमा कोरेगांव रणसंग्रामात शहीद झालेल्या ५०० शुरवीरांना प्रा. महेंद्र अल्टो यांनी भीमा भीमा कोरेगाव येथे जाऊन विनम्र अभिवादन व त्यांच्या शौर्य आणि पराक्रमाला..सॅल्युट.. क्रांतिकारी जय भीम..!

## शेतकरी शेतमजूर अडकत चाललाय मायक्रो फायनान्सच्या जाळ्यात.

किनवट/शेख शौकत :- तालुक्यात एकीकडे मजुरांना काम नाही म्हणून मजुरांचे जथेच्या जथे पर राज्यात स्थलांतरित होत असताना शेतीतून मिळणारं उत्पन्न हे शेतकऱ्यांच्या कौटुंबिक खर्चालाच पुरत नाही. त्यामुळे खरिपाच्या पेरणीसाठी बी-बियाणं, खतं, औषधं व मशागत या खर्चासाठी कर्ज घ्यावंच लागतं. त्यात बँका आणि सोसायटीकडून मिळणारे पिककर्ज अत्यल्प असते. तेही वेळेवर मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना दुकानदारांकडून उधार-उसनवारी, खासगी सावकार किंवा मायक्रो फायनान्सकडून कर्ज घेऊन पेरणी व इतर खर्च भागवावा लागतो.बँक-सोसायटीकडून पीककर्ज मिळेल, या आशेनं शेतकरी जर पेरणी करायचे थांबले तर खोळंबा होतो. पेरणी उशिरा केली तर त्याचा उत्पादनावर परिणाम होतो. शेतीचे पुरेसे उत्पन्न निघत नसल्याने अनेक शेतकऱ्यांना मायक्रो फायनान्स चे हप्ते कसे फेडायचे कोडे पडलेले असते. मायक्रो फायनान्स कडून कर्ज घेतले. पण गावामध्ये रोजगार भेटत नाही कर्जाचे हप्ते कसे फेडावे म्हणून या विवंचनेतून मजुराचे बाहेर राज्यात रोजगारासाठी स्थलांतर होत आहे. तर शेतकऱ्यांना बँकेकडून पीककर्ज वेळेवर न मिळाल्यानं प्रत्येक वर्षी प्रथम खासगी सावकार आणि मायक्रो फायनान्स कंपनीकडून कर्ज घेऊन पेरणी करावी लागते.

## त्रिरत्न दिनदर्शिका २०२४ लातूरमध्ये उपलब्ध




त्रिरत्न दिनदर्शिका २०२४ ही नागपूर येथून मागील दोन वर्षांपासून सुरू करण्यात आली आहे आपण या दिनदर्शिकेत दैनंदिन माहिती भारतातील महापुरुषांची माहिती, बौद्ध पौर्णिमा व तिचे महत्त्व व सार्वजनिक सुट्ट्या दिलेल्या आहेत
२०२४ च्या दिनदर्शिकेचे विशेष महत्त्व म्हणजे अरहंत संघ, बोधिसत्व संघ, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे तीन गुरू, इतिहासातील बौद्ध सम्राट, बौद्ध प्रतीके आणि प्रतिमा, भूतकाळातील सोळा गुरू, उर्गेन संघरक्षित यांचे आठ गुरू,महान बौद्ध लेखक, बौद्ध धम्माला गतिमान करणारे आधुनिक शिल्पकार..,सांची स्तूप इत्यादीची माहिती देण्यात आली आहे.
तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी प्रत्येक दिवशी काय केले आहे ती माहिती दिली आहे म्हणून ही दिनदर्शिका महत्त्वपूर्ण असून संग्रह ठेवण्यासारखी आहे यामधील ऐतिहासिक फोटो व माहिती एकत्र करून दिली आहे त्यामुळे या दिनदर्शिकेचे महत्व विशेष आहे.सहयोग राशी रु ६० आहे

## आंतर महाविद्यालयीन पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत एसएसटीच्या विद्यार्थ्यांची सुवर्ण कामगिरी

उल्हासनगर / प्रतिनिधी : मुंबई विद्यापीठ, ठाणे स्पोर्ट्स कमिटी आणि जीवनदीप महाविद्यालय गोवेली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर महाविद्यालयीन पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत एस एस टी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उत्तम कामगिरी करत एक सुवर्ण आणि एक कांस्यपदकाची कमाई केली आहे. मुंबई विद्यापीठातर्फे आयोजित केल्या गेलेल्या या स्पर्धांमध्ये ठाणे जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांनी आपला सहभाग नोंदविला होता . यामध्ये मुलींच्या गटात एस एस टी महाविद्यालयाच्या प्रांजली पगारे हिने सुवर्णपदकावर आपले नाव कोरले असुन भूमिका कोळसे हिने कांस्यपदकाची कमाई केली आहे . या विजयी खेळाडूंची निवड विभागीय स्पर्धांसाठी करण्यात आली आहे . तर विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. आपल्या यशाचे श्रेय खेळाडूंनी महाविद्यालय आणि क्रीडा शिक्षकांना दिले आहे. एस एस टी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . पुरस्वानी यांनी अभिनंदन केले आहे.

## वसंतराव मुंडे व विश्वासराव आरोटे यांचा वाढदिवस रुग्णांना फळे वाटप करून साजरा







लातूर - महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे व राज्य सरचिटणीस डॉ.विश्वासराव आरोटे यांचा वाढदिवस १ जानेवारी रोजी लातूर जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे रुग्णांना फळे व बिस्कीट वाटून साजरा केला.

पत्रकारांच्या जीवनात आर्थिक सक्षमीकरणासाठी लढा उभा करणारे वसंतराव मुंडे यांच्या कार्याची दखल घेऊन एबीपी माझा या वृत्तवाहिनीने महाराष्ट्राचे अनमोल रत्न म्हणून प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित केले तर लोकमत मीडिया ग्रुपने आंतरराष्ट्रीय स्तरावरील एक्सलन्स इन सोशल जर्नालिझम अवॉर्ड दुबई येथे प्रदान करून मुंडे यांच्या कार्याचा गौरवही केला. तसेच ग्रामीण भागातील पत्रकार असो की शहरी भागातील त्यांना न्याय मिळाला पाहिजे म्हणून महाराष्ट्रभर फिरून पत्रकारांच्या प्रश्नासाठी सरकारी दरबारी आवाज उठवणारे पत्रकारांचे माऊली म्हणजेच डॉ. विश्वासराव आरोटे यांची ओळख आहे.राज्यातील पत्रकारांना प्रत्येक अधिवेशनात साहित्य वाटप करण्यात पुढाकार घेणारे आरोटे यांची वेगळी ओळख आहे.कोरोना काळामध्ये त्यांनी महाराष्ट्रातील पत्रकारांना मोलाची मदत केली.या कामाची दखल घेऊन राज्य शासनाच्या वतीने त्यांचा गौरवही करण्यात आला. एवढेच नव्हे तर अमेरिका सारख्या देशानेही त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना डॉक्टरेट पदवी बहाल केली म्हणूनच आज लातूरच नव्हे तर राज्यभर या दोन्हीही गुणवंतांचे वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम घेऊन साजरी करतात. आज विलासराव देशमुख शासकीय रुग्णालयात फळे वाटप करताना अधिष्ठाता डॉ.समीर जोशी, सर्जरी विभागप्रमुख डॉ.मेघराज चावडा, महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेच्या राज्यसचिव सुमित्रा तोटे,महाराष्ट्र विकास आघाडीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष बसवंतआप्पा उबाळे ,कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे राज्य सचिव प्रा. यु .डी.गायकवाड,पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष अशोक देडे, सरचिटणीस अशोक हनवते, उपाध्यक्ष अफसर कारभारी,जिल्हा संघटक सुधाकर फुले,कोषाध्यक्ष अरुण कांबळे, सदस्य वाल्मीक केंद्रे, विकास कांबळे,मनोज कोरे ,बापू घोलप, शिवाजी कांबळे आदी पत्रकार उपस्थित होते.

## संपादकीय....

# पुतिन-पंथीय की..?

माणसाप्रमाणे वर्षदेखील आपापले नशीब घेऊन जन्मास येत असावे बहुधा. फरक इतकाच की माणसास नशीब बदलण्याची संधी असते. वर्ष या कालघटकाबाबत असे म्हणता येणार नाही.जगभरातील जवळपास ६४ देश २०२४ या एका वर्षांत आपापल्या हद्दीतील लोकप्रतिनिधी निवडण्यासाठी मतदान करतील.. पण लोकशाहीचा विजय किती देशांत होईल?

माणसाप्रमाणे वर्षदेखील आपापले नशीब घेऊन जन्मास येत असावे बहुधा. फरक इतकाच की माणसास नशीब बदलण्याची संधी असते. वर्ष या कालघटकाबाबत असे म्हणता येणार नाही. उदाहरणच द्यावयाचे झाल्यास १९७९ ते १९८९ या दशकाचे देता येईल. सोव्हिएत फौजा अफगाणिस्तानात घुसल्यापासून सुरू झालेला या दशकाचा प्रवास, इराण-इराक युद्ध, बर्लिन भिंतीचे कोसळणे, सोव्हिएत रशियाचे विघटन इत्यादी अनेक महत्त्वाच्या भोज्यांस स्पर्श करून इंटरनेटच्या मायानगरीच्या जन्मापर्यंत येऊन थांबतो. आपल्याकडेही मुंबईतील गिरणी संप, इंदिरा गांधी यांची हत्या आदी अनेक कारणांनी हा कालखंड महत्त्वाचा ठरतो. अशा संस्मरणीय वर्षांच्या मालिकेत आजपासून सुरू होत असलेले २०२४ साल आपल्या आगळ्या विक्रमाने स्थान मिळवू शकेल. या आंग्लसंवत्सराची नोंद जगाच्या इतिहासात निवडणुकांचे वर्ष अशी केली जाईल. एक नव्हे, दोन नव्हे तर जगभरातील जवळपास ६४ देश या एका वर्षांत आपापल्या प्रांतातील लोकप्रतिनिधी निवडण्यासाठी मतदान करतील. जगात सध्या हयात असलेल्या समस्त मानवांपैकी साधारण ५० टक्के मनुष्यप्राण्यांस, म्हणजे सुमारे २०० कोटी, आज सुरू होणाऱ्या वर्षांत मतदार म्हणून एक वेगळे महत्त्व येईल. यातील काहींचे मतदान म्हणजे 'वरून कीर्तन आतून तमाशा' असेच असेल, हे खरे. म्हणजे रशिया. त्या देशाचे सर्वेसर्वा व्लादिमीर पुतिन यांनी स्वत:स तहहयात अध्यक्षपदी राहता येईल, अशी व्यवस्था केलेली आहे. त्यांच्या देशात तसे मतदान होतेच. पण मतदारांस पुतिन यांच्या मतपत्रिकेवर पसंतीची मोहोर उमटवण्याखेरीज दुसरा काही पर्याय नसतो. त्यामुळे पुतिन हे नेहमीच 'प्रचंड मताधिक्या'ने निवडून येतात. आताही त्यांचा आव्हानवीर अलेक्सी नावाल्नी हा रशियात दूर कोपऱ्यातील तुरुंगात खितपत आहे. तेव्हा पुतिन यांचा मार्च महिन्यातील निवडणुकांतील विजय निश्चित. पुतिन यांच्या प्रमाणेच बेलारूस, उत्तर कोरिया, सीरिया आदी काही देशांतील राज्यकर्तेही भाग्यवान. कारण पुतिन यांच्याप्रमाणेच त्यांनाही त्यांच्या विजयाची शंभर टक्के हमी आहे. या पुतिन यांच्या पावलांवर पाऊल टाकण्याचा मोह अनेकांस कसा होतो, हे आता नव्याने नमूद करावयाची गरज नाही. हे सत्य वगळता अन्य निवडणुकोत्सुक देशांची दखल घ्यायला हवी. यात उल्लेखनीय म्हणजे अमेरिका. जगातील ही खरी आणि बलाढ्य लोकशाही. पण सध्या तिची कीव करावी तितकी कमी. इंग्रजीत 'कॉट बिट्वीन डेव्हिल ॲण्ड द डीप सी' असा वाक्प्रचार आहे. अमेरिका सध्या अशी एका बाजूस दैत्य आणि दुसरीकडे खोल-पण मृतप्राय समुद्र अशा तावडीत सापडलेली आहे. जवळपास निश्चल, बधिर अशा विद्यमान अध्यक्ष बायडेनबाबांस निवडून द्यावे की नको त्या दिशेने अविचल, दुष्टबुद्धी ट्रम्पुल्यास मत द्यावे अशी ही गंभीर समस्या. एखाद्यास हृदरोग की अर्धांगवात इतकाच पर्याय असावा तसे हे. या निवडणुकांचे निकाल अमेरिकेच्या प्रथेप्रमाणे ८ नोव्हेंबरास जाहीर होतील. चार वर्षांच्या खंडानंतर ट्रम्प पुन्हा मतपत्रिकेवर असतील. त्यांच्या पहिल्या निवडणूक निकालाचा तर शहाण्या भारतीयांनी धसकाच घेतलेला असणार. कारण तिकडे अमेरिकेत ट्रम्प निवडून येत असताना इकडे त्याच दिवशी आपण निश्चलनीकरण अनुभवले. दोन्हीही घटना अत्यंत बुद्धिमानच तशा. तेव्हा या वर्षी ८ नोव्हेंबरास ट्रम्प निवडून येतील अशी परिस्थिती असल्यास भारतीयांचाही श्वास रोखला जाईल, हे निश्चित. अमेरिकेची बलाढ्य लोकशाही आपला अध्यक्ष निवडत असताना आद्य संसदीय लोकशाही ग्रेट ब्रिटनही आपला पंतप्रधान निवडेल. त्या देशात जवळपास १४ वर्षे हुजूर पक्षाची सत्ता आहे. टोनी ब्लेअर आणि त्यांच्याकडून पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारणारे गॉर्डन ब्राऊन यांच्यानंतर मजूर पक्षास सत्ता मिळालेली नाही. आपल्या सत्तापदाच्या जवळपास दीड दशकात डेव्हिड कॅमेरून, थेरेसा मे, बोरीस जॉन्सन, लिझ ट्रस आणि आता ऋषी सुनक या हुजूर पक्षीय पंतप्रधानांनी त्या देशाचा करून ठेवलेला विचका पाहता ब्रिटिश नागरिकांनी यावेळी मजूर पक्षास कौल दिल्यास आश्चर्य नाही. तसे झाल्यास हुजूर पक्षाची सद्दी संपवण्याचे पुण्य भारतीय वंशाच्या वगैरे सुनक यांच्या खाती जमा होईल.सुनक यांच्या शेजारील अनेक देशांतही यंदा निवडणुका होतील. समग्र युरोप, त्यातील ऑस्ट्रिया, बेल्जियम आदी देशांतही लवकरच निवडणुकांचे वेध लागतील. अफ्रिका खंडातही अनेक देश या वर्षांत निवडणुकांस सामोरे जात असले तरी त्यांपैकी सर्वात मोठ्या आणि लोकशाही असलेल्या दक्षिण अफ्रिकेतील निकालाकडे जगाचे लक्ष असेल. याखेरीज आशिया खंडातील बांगलादेश, दक्षिण कोरिया, तैवान, इंडोनेशिया, पाकिस्तान आदी आपल्या शेजार-पाजारीही पुढील वर्षी निवडणुका आहेत. बांगलादेशाच्या विद्यमान पंतप्रधान शेख हसीना याही तशा हुकूमशहा म्हणाव्यात अशा. त्यांनीही आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या मुसक्या आवळल्या असून यंदाच्या निवडणुकीत त्यामुळे काय होते पाहायचे. पुढील आठवड्यात ७ जानेवारीला या देशात मतदान होईल. पाकिस्तानातील लोकशाहीविषयी बोलणेही व्यर्थ. द. कोरिया, इंडोनेशिया, तैवान या अन्य निवडणुका राजकीयपेक्षा आर्थिक आणि जागतिक कारणांसाठी महत्त्वाच्या. तैवानमधे कोण सत्तेवर येणार यावर चीन-तैवान आणि म्हणून चीन-अमेरिका संबंधांचे भवितव्य पणास लागेल. आताप्रमाणे स्वाभिमानी आणि म्हणून चीन-द्वेषी राजवट त्या देशात कायम राहिली तर तैवान हे पुढील युक्रेन असण्याची शक्यता दाट. तसे झाल्यास पुन्हा एकदा जागतिक शांततेस आव्हान मिळेल, हे निश्चित.

# पूर्वजांच्या शौर्यापुढे आम्ही नतमस्तक!

(भिमा कोरेगांव शौर्य दिन विशेष.)

या शौर्य दिनानिमित्त विजय स्तंभास अभिवादन करण्यासाठी राज्यभरातून लाखो आंबेडकर अनुयायी येत असतात. पहाटेपासूनच विजय स्तंभास अभिवादन करण्यासाठी लोकांची मोठी गर्दी उसळत असते. २०६ वर्षांपुर्वी कोरेगाव भीमा येथे झालेल्या लढाईत महारवीर आणि इतर समाजातील सैनिकांच्या पराक्रमामुळे ब्रिटिशांनी पेशव्यांच्या सैन्याचा धुव्वा उडविला होता. दि.१ जानेवारी १९२७ रोजी विश्ववंद्य विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या विजय स्तंभास भेट देऊन हा इतिहास पुढे आणला. तेव्हापासून या ठिकाणी शौर्य दिवस साजरा करण्यास सुरुवात झाली. याबद्दल सविस्तर बोधप्रद व रोचक माहिती श्री कृष्णकुमार लक्ष्मी-गोविंदा निकोडे गुरूजींनी सदर लेखात संकलित केली आहे... संपादक.

प्रत्येक शौर्य दिनाच्या पार्श्वभूमीवर कोरेगाव भीमा परिसरात म्हणजेच शिक्रापूर आणि लोणीकंद पोलीस स्टेशनच्या हद्दीत ३१ डिसेंबर आणि १ जानेवारी या कालावधीत मद्य विक्रीवर बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या काळात परिसरातील सर्व मद्य दुकाने पूणर्तः बंद ठेवली जातात. या बंदीच्या नियमाचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी देत असतात. यासाठी काही वर्षांपूर्वी जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख यांनी विजयस्तंभ परिसरात नियोजनाशी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली होती.

पार्श्वभूमी: इ.स.१८००च्या दशकांत मराठा साम्राज्य अनेक तुकड्यांत विभागलेले होते. त्यात पुण्याचे पेशवे, ग्वाल्हेर संस्थानाचे शिंदे, इंदूरचे होळकर, बडोद्याचे गायकवाड आणि नागपूरचे भोसले अशा तुकड्यांमुळे कमकुवत साम्राज्य होते. ब्रिटिश साम्राज्याने ग्वाल्हेर, इंदूर, बडोदा व नागपूर यांच्या प्रमुखांशी शांतता करार वा तह करून त्या त्या संस्थानांचा भाग आपल्या राज्याला जोडला होता. दि.१३ जून इ.स.१८१७ रोजी पेशवे आणि गायकवाड घराण्यात महसुलावरून वाद झाला; त्यात बाजीराव पेशवे यांनी ब्रिटिशांची मध्यस्थी घेतली व बडोदा संस्थानाचा मोठा भाग पेशवाईत समाविष्ट केला. परंतु यासाठी ब्रिटिशांची मध्यस्थी घेतल्याने अप्रत्यक्षपणे तो भाग ब्रिटिशांनी आपल्या राज्यास जोडला. त्यामुळे मराठा साम्राज्य ब्रिटिश अधीनस्त झाला आणि पेशवे केवळ नामधारी उरले. अल्पावधीतच पेशव्यांनी ब्रिटिशांना नमवण्याचा प्रयत्न खडकीची लढाईत केला, परंतु ब्रिटिशांनी तेथेही पेशव्यांचा पराभव केला. ही लढाई दि.५ नोव्हेंबर १८१७ रोजी झाली होती. त्यानंतर पेशव्यांनी तेथून सातारा येथे पळ काढला, तेव्हा ब्रिटिशांनी पूर्णपणे पुण्यावर ताबा मिळवला. पुणे हे चार्लस बार्टन बर व कर्नल जनरल स्मिथ यांच्या नेतृत्वाखाली होते आणि ते पेशव्यांचा पाठलाग करत होते. दरम्यान कर्नल स्मिथ याला भिती वाटत होती की, पेशवे तेथूनही निसटून कोकणात जातील व तेथे राज्य करतील, म्हणून त्याने कर्नल बर याला कोकणात आणखी कुमक पाठवण्यास सांगितली. एक जास्तीची कुमक पुण्याजवळील शिरूर येथे ठेवण्यास सांगितली. दरम्यान पेशवे कर्नल स्मिथचा पाठलाग चुकवून निसटून जाण्यात यशस्वी झाले, परंतु दक्षिणेकडून कर्नल थेओफिलस प्रिझलर सैन्यासह तयार होताच, ते पाहून पेशव्यांनी मार्ग बदलला आणि पूर्वेकडे चालत नाशिकच्या वायव्य भागातून पुढे सरकले आणि कर्नल स्मिथ त्यांच्यावर हल्ला करेल, या भीतीने ते पुन्हा पुण्याकडे वळले. डिसेंबर १८१७च्या अखेरीस कर्नल बरला बातमी समजली की, पेशवे पुण्यावर चालून येत आहेत, तेव्हा त्याने शिरूर येथील सैन्याला मदतीसाठी तयार राहण्यास सांगितले. ते सैन्य पुढे सरसावले आणि त्यांची लढाई कोरेगाव भिमा या गावात जुंपली.

मराठा सैन्य: मराठ्यांचे २८ हजार सैन्य होते, ज्यातील २० हजार घोडदळ, ८ हजार पायदळ सतत तैनात असे. कंपनी सरकाराच्या सैन्यांनी हल्ला करू नये, यासाठी प्रत्येकी ६शे सैनिकांच्या तीन तुकड्या तैनात असत. या सैनिकांत अरब, गोसावी व मराठा जातीचे सैनिक असत. हे सैन्य पहिल्या फळीत हल्ला करण्यासाठी अरब सैन्याचा वापर करीत असे. तसेच त्यासाठी भाडोत्री सैनिक व त्यांचे वारस यांचाही सैन्यात वापर केला जात असे. सैन्यात घोडदळ आणि तोफखाना असे दोन विभाग ठेवलेले असत. लढाईचे नेतृत्व बापू गोखले, अप्पा देसाई आणि त्रिंबक डेंगळे यांनी केले होते. पैकी त्रिंबकजी डेंगळे हे कोरेगाव लढाईत प्रत्यक्ष सहभागी होते. तर अन्य जवळच्या फूलसेहर आत्ताचे फुलगाव येथे होते.

ब्रिटिशांचे सैन्य: ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीचे ८३४ सैनिक होते. दुसऱ्या बटालियन- बॉम्बे नेटिव्ह आर्मी तुकडी क्र- १०२मधील महार जातीचे सुमारे ५०० सैनिक होते. या तुकडीचे नेतृत्व कॅप्टन फ्रान्सिस स्टाँटन यांनी केले. अन्य अधिकाऱ्यांमध्ये लेप्टनंट आणि अड्जुटंट पिटसन, लेफ्टनंट जॉन्स, असिस्टंट सार्जंट विंजेट हे होते. लेफ्टनंट स्वान्सटन नेतृत्व करीत असलेले सुमारे ३०० सैनिकांचे घोडदळ होते. २४ युरोपियन आणि ४ तोफा चालवणारे स्थानिक मद्रासी गोलंदाज व सहा पावडर तोफा होत्या. यांचे नेतृत्व लेफ्टनंट चिसलोम करत होते. याचबरोबर साहाय्यक सार्जंट वायली-वायल्डे यांचा तोफाखान्यात समावेश होता. महारांचे नेतृत्व रतननाक, जाननाक व भकनाक या तिघांनी केले होते.

शहिद व जखमी महारवीर: कोरेगांवच्या युद्धात २० महार सैनिक आणि ५ अधिकारी शहीद झाले. त्यांना माझे या लेखरुपाने कोटी कोटी सॅल्यूट..! शहीद झालेल्या महारवीरांची नावे, त्यांच्या सन्मानार्थ बनवल्या गेलेल्या स्मारकावर अंकित आहेत. ती अशी- गोपनाक मोठेनाक, शमनाक येशनाक, भागनाक हरनाक, अबनाक काननाक, गननाक बालनाक, बालनाक घोंड़नाक, रूपनाक लखनाक, बीटनाक रामनाक, बटिनाक धाननाक, राजनाक गणनाक, बापनाक हबनाक, रेनाक जाननाक, सजनाक यसनाक, गणनाक धरमनाक, देवनाक अनाक, गोपालनाक बालनाक, हरनाक हरिनाक, जेठनाक दीनाक आणि गननाक लखनाक. या लढाईत महारांचे नेत्रत्व करणाऱ्यांची नावे अशी- रतननाक, जाननाक, व भकनाक. तर या युद्धात जखमी झालेल्या महार योद्धांची नावे येणेप्रमाणे- जाननाक, हरिनाक, भीकनाक, रतननाक आणि धननाक.



लढाई: भिमा कोरेगाव लढाई दरम्यान ब्रिटिशांची व्यूहरचना- पेशवा दुसरा बाजीराव नासिककडे न जाता ओझरचा घाट उतरून जुन्नर खेडावरून ता.३० डिसेंबर रोजी चाकण येथे येऊन पोहचला, अशी बातमी स्मिथ यास कळली. पूर्वी कोंकणांतून मुंबईकडून इंग्रज फौज येत होती, तिला गाठावे किंवा पुण्यावर येऊन ते शहर एकदम हस्तगत करावे, असा बाजीरावचा बेत असल्याचे स्मिथ यास दिसून आले, दोन्ही गोष्टी इंग्रजांस बिकटच होत्या. पुण्यास इंग्रजांचा बंदोबस्त अगदींच तात्पुरता होता. त्याने आपल्या मदतीस शिरूरहून जास्त फौज बोलावली होती, त्यावरून कॅ.स्टाँटन थोडे इंग्रज सैन्य बरोबर घेऊन ता.३१ डिसेंबर १८१७रोजी रात्री ८ वाजता शिरूरहून निघाला, तो दुसऱ्या दिवशी स.१० वाजता कोरेगांवजवळ येऊन उतरला. तेथील टेकडीवरून त्याला पेशव्याची प्रचंड फौज भीमा नदीच्या काठीं दिसली. स्टाँटनची बातमी बापू गोखल्यास होतीच. घोडनदीहून वरील इंग्रज फौज पुण्यास येत होती. तिची बाजीरावाशीं अकस्मात गाठ पडली. बापू गोखल्यास श्रीमंतानी आज्ञा केली, की आज लढाई करून आम्हास पुढे जाण्यास मार्ग करून द्यावा. गावास लहानशी तटबंदी होती तेथे इंग्रज आश्रयार्थ गेले. त्यावर दुसऱ्या बाजूने मराठ्यांनी तोफांचा मारा सुरू केला. जागा अडचणीची असल्यामुळे तोफा बंद करून मराठ्यांकडील अरबांनी व पायदळांनी इंग्रजांवर चाल केली. तेव्हा संगिनीचे व तरवारीचेच युद्ध झाले. दोन्ही बाजूंचे भरपूर नुकसान झाले. रात्री ९ वाजेपर्यंत लढाई चालून मराठ्यांचे सैन्य आपल्या छावणीकडे परत आलें. सकाळी इंग्रजांच्या सैनिकांनी पाहिले तर मराठा सैन्य निघून गेल्याचे दिसले. यात इंग्रजांचे २७५ मारले गेले तर १७५ जखमी झाले, त्यापैकी बहुतेक होतकरूच होते. मराठ्यांचे सुमारे ५००-६०० लोक पडले. बाजीराव तर अगोदरच जेजुरीच्या वाटेने साताऱ्याकडे निघाला होता. पाठीमागून जनरल स्मिथ येत असतां त्यास ओझरच्या घाटात त्रिंबकजी डेंगळ्याच्या रामोशांनी इतके सतावून सोडले, की ता.२ जानेवारी १८१८ रोजी जेमतेम तो चाकणला येऊन पोचला. त्याच दिवशी कॅ.स्टाँटन हा जखमी झालेले लोक व उरलेली फौज बरोबर घेऊन परत शिरूरच्या छावणीत गेला. हेन्री टी प्रिंसेप यांनी लिहिलेल्या हिस्टरी ऑफ द पॉलटिकल अँड मिलिट्री ट्रान्जॅक्शन्स इन इंडिया पुस्तकात या लढाईचा संदर्भ आहे. महार समाजातल्या माणसांचा समावेश असलेल्या ईस्ट इंडिया तुकडीच्या धाडसाचे वर्णन या पुस्तकात आहे.

कोरेगावची लढाई हीची अन्य नावे- कोरेगाव भिमाची लढाई, भिमा कोरेगावची लढाई अशी आहेत. ही महाराष्ट्राच्या पुणे जिल्ह्यामधील कोरेगाव भिमा या गावात भीमा नदीच्या काठावर झालेली एक ऐतिहासिक लढाई आहे. ही लढाई दि.१ जानेवारी १८१८ रोजी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी आणि मराठा महासंघाच्या पेशवा गटामध्ये झाली होती. ब्रिटिशांच्या बाजूने एकूण ८३४ सैनिक होते, ज्यांचे नेतृत्व सेनापती कॅप्टन फ्रान्सिस एफ.स्टाँटन करीत होता. इंग्रजांच्या सैनिकांत बॉम्बे नेटिव लाइट इन्फेंट्री तुकडीचे सुमारे ५०० महार जातीचे सैनिक होते, काही युरोपियन व इतर काही सैनिक होते. तर मराठ्यांच्या बाजूने २८ हजार सैनिक होते, ज्यांचे नेतृत्व सेनापती पेशवा बाजीराव दुसरा करीत होता. मराठ्यांच्या सैनिकांत मराठा, अरब व गोसाई या सैनिकांचा समावेश होता. दुसरा बाजीराव पेशवा यांच्या नेतृत्वाखालील सैन्य कंपनीच्या ताब्यात असलेल्या पुण्यावर हल्ला करण्याच्या मार्गावर असताना अनपेक्षितपणे त्यांस कंपनीचे सैन्य आडवे आले, जे पुण्यातील ब्रिटीश सैन्याला मदत देण्यासाठी निघाले होते. पेशव्यांनी कोरेगावात घुसखोरी करणाऱ्या सैन्यावर हल्ला करण्यासाठी सुमारे २ हजार सैनिक पाठवले. कॅप्टन फ्रान्सिस स्टॉन्टन यांच्या नेतृत्वाखालील कंपनीच्या सैन्याने जवळजवळ १२ तास लढाई केली. मोठ्या ब्रिटीश सैन्याच्या आगमनाच्या भीतीने पेशव्यांच्या सैन्याने शेवटी माघार घेतली. ही लढाई इंग्रज-मराठा युद्धाच्या मालिकेतील तिसऱ्या इंग्रज-मराठा युद्धाचा भाग होती. या युद्धाच्या मालिकेने पेशव्यांची राजवट संपली. यानंतर पुढे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता जवळजवळ संपूर्ण पश्चिम, मध्य आणि दक्षिण भारतात पसरली गेली.

पेशवाईच्या काळात अस्पृश्यतेचे पालन मोठ्या प्रमाणावर होत होते व महारांना अत्यंत हीन वागणूक दिली जात असे, याला विरोध म्हणून महार सैनिक आत्मसन्मासाठी ब्रिटिशांच्या बाजूने पेशवे व मराठ्यांविरूद्ध लढले आणि विजयी झाले. १८००च्या दशकांत पुण्याचे पेशवे, ग्वाल्हेर संस्थानाचे शिंदे, इंदूरचे होळकर, बडोद्याचे गायकवाड आणि नागपूरचे भोसले असे अनेक तुकड्यांत मराठा साम्राज्य विभागलेले होते, त्यापैकी ग्वाल्हेर, इंदूर, बडोदा व नागपूर हे मराठा साम्राज्याचे गट ब्रिटिश साम्राज्यात सामील झालेले होते. कोरेगाव भिमाच्या युद्धानंतर ब्रिटिशांनी सैनिकांच्या स्मरणार्थ भीमा नदीच्या काठी ७५ फूट उंच विजयस्तंभ उभारून त्यावर कंपनीच्या ४९ सैनिकांची नावे कोरली. यामध्ये २० शहीद व ३ जखमी महार सैनिकांची नावे आहेत. या स्तंभावर लिहिले आहे- जपश ेष ींहश ढीर्ळीाहि ेष ींहश ईळींळीह -ीू ेष ींहश एरीींह.

या महाप्रतापी महार सैनिकांच्या सन्मानार्थ येथील विजयस्तंभाला मानवंदना देण्यासाठी दरवर्षी १ जानेवारी रोजी महाराष्ट्रासह देशभरातून बौद्ध, विशेषतः पूर्वाश्रमीचे महार अन्य दलित, शीख व इतर जातीचे लोकही लाखोंच्या संख्येने येत असतात. बुद्धमूर्ती व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा समोर ठेवून बुद्धवंदना घेऊन शहीद सैनिकांच्या जयस्तंभाला मानवंदना दिली जाते.

!! शौर्य दिनानिमित्त सर्वांना क्रांतिकारी जय भीम !!

*************

**- संकलन व शब्दांकन -**

**श्री कृष्णकुमार लक्ष्मी-गोविंदा निकोडे गुरूजी.**

**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**

# कुस्ती खेळांमध्ये राजकीय आखाडा नकोच!

कुस्ती महासंघाबद्दल सरकारचा निर्णय योग्य दिशेने वाटचाल करीत आहे.भारतीय कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष बृजभूषण शरण सिंह यांच्या विरोधात लैंगिक शोषणाचे आरोप असल्याने त्यांच्यावर कारवाईच्या मागणीसाठी आंतरराष्ट्रीय पदक विजेते खेळाडू रस्त्यावर उतरले होते आणि आताही याबाबतीत तटस्थ आहेत. नव्याने निवडणुक घेण्यात आली व दिनांक २१ डिसेंबर २०२३ ला महासंघाच्या निवडणूकीनंतर नवी कार्यकारिणी संजय सिंह यांच्या नेतृत्वात अस्तित्वात आली.परंतु या निवडणुकीत मोहरा फक्त संजय सिंह होते व संपूर्ण कमांड बृजभूषण शरण सिंह यांच्या हातात होती.त्यामुळे बृजभूषण शरण सिंह यांच्या प्रभावावरून नवा वाद निर्माण झाला आणि कुस्तीगीर आक्रमक झाले.या पार्श्वभूमीवर १५ ते २० वर्षांखालील राष्ट्रीय स्पर्धा घाईघाईने घेण्याची नवनिर्वाचित कार्यकारिणीने केलेली घोषणा त्यांच्या अंगलट आली आणि क्रीडा मंत्रालयाने रविवारी दिनांक २४ डिसेंबर २०२३ ला पुढील आदेशापर्यंत निलंबनाची कारवाई केली आहे.यामुळे कुस्ती खेळाडूंमध्ये न्याय मिळण्याच्या आशा उंचावल्या आहेत.कारण भारतीय महिला कुस्तीपटुंनी महासंघाचे माजी अध्यक्ष बृजभूषण शरण सिंह यांच्यावर लैंगिक छळवणूकीचे अनेक गंभीर आरोप लावले होते आणि यात बरंच काही सत्य होते.त्यामुळे त्यांना पदावरून पायउतार व्हावे लागले.यानंतर भारतीय कुस्ती महासंघाची निवडणूक झाली यातही लैंगिक छळवणूकीचा आरोप असलेले बृजभूषण शरण सिंह यांचे निकटवर्तीय संजय सिंह यांच्या माध्यमातून दिसून आले आणि याच्या विरोधात साक्षी मलिक,विनेश फोगट,बजरंग पुनिया सह अनेक पदक विजेते कुस्तीपटुंनी आक्रमक पवित्रा घेतला व आपले पदक सरकारला परत करण्याचा निर्णय घेतला व सरकार एकदम जागी झाली आणि लक्षात आले की ही बाब योग्य नाही.क्रिडामंत्रालय ताबडतोब एक्शनमोडमध्ये आली व निवडणूक आलेली संजय सिंह यांच्या नेतृत्वातील नवीन कार्यकारिणी दिनांक २४ डिसेंबरला निलंबित करण्यात आली.त्यामुळे आज कुस्तीपटूंच्या न्यायाच्या आशा उंचावल्या आहेत ही स्वागतार्ह बाब आहे.परंतु सरकारने बृजभूषण शरण सिंह यांच्यावर खेळाडूंनी लावलेल्या आरोपांच्या संदर्भात कोणताही कठोर कारवाई केलेली नाही याचे दुःख आजही कुस्तीपटूंना व देशाला आहे.त्यामुळे कुस्तीपटुंनी बृजभूषण शरण सिंह यांच्यावर ताबडतोब कारवाई व्हावी याकरिता पुरस्कार परत करण्याचा सिलसिला सुरूच आहे.सध्या बृजभूषण शरण सिंह याचे प्रकरण न्यायालयात आहे त्यामुळे संपूर्ण खेळाडूं आजही न्याय मिळण्याच्या प्रतीक्षेत आहेत.कुस्तीमहासंघाचा वाद आता सरकारच्या पाल्यात असुन न्याय प्रतिष्ठेत आहे. क्रिडामंत्रालयाने पॅरिस ऑलिम्पिकची पुर्वतयारी व्हावी या पार्श्वभूमीवर भारतीय कुस्तीची संपूर्ण सूत्रे हंगामी समितीकडे दिले.कारण राष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन लवकरात लवकर व्हावेत. हे सरकारचे योग्य आणि निर्णायक पाऊल असल्याचे मी समजतो.भारतीय ऑलिम्पिक संघटनेने भारतीय कुस्ती महासंघाचा कारभार पाहण्यासाठी नव्या तीन सदस्यीय हंगामी समितीची दिनांक २७ डिसेंबर २०२३ ला निवड केली.यामध्ये पूर्वीच्या समितीनचे अध्यक्ष भूपेंद्र सिंह बाजवा यांच्यासह माजी हॉकी कर्णधार मणीपंडे सोमय्या आणि नुकत्याच द्रोणाचार्य पुरस्कार जाहीर झालेल्या मंजूषा पावनगडकर-कन्वर असतील.यामुळे कुस्तीपटुंमध्ये एक नवीन ऊर्जा निर्माण होवून देशातील खेळाडूंना प्रगतीपथावर अवश्य नेतील यात दुमत नाही.पॅरिस ऑलिम्पिक केवळ सात महिन्यावर आले आहे याचे गांभीर्य लक्षात घेऊन ताबडतोब संपूर्ण वाद मिटायला हवेत. कारण वेळ कमी आहे तयारी भरपूर करायची आहे यावर सरकारने व क्रीडा मंत्रालयाने जातीने लक्ष देण्याची गरज आहे.सरकार व क्रिडा मंत्रालय यांनी लक्षात ठेवले पाहिजे की प्रत्येक खेळाडू हा मातीतून तयार होतो त्यामुळे त्यांचा सन्मान होने गरजेचे आहे. महिला खेळाडूंवर जर कोणी लैंगिक छळवणूक किंवा अत्याचार करीत असेल त्यावर न्यायप्रक्रियेच्या माध्यमातून लवकरात कठोर कारवाई व्हायलाच हवी. त्याचप्रमाणे देशातील कोणताही खेळाडू असो त्याला सरकार कडून, लोकप्रतिनिधींकडून, संघांच्या अध्यक्षांकडुन,खेळ समित्यांकडुन सन्मानजनक वागणूक मिळायलाच हवी यामुळे खेळाडूंची मान उंचावेल व खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होऊन मनोबल वाढण्यास मोठी मदत होईल व यांचे चित्र पदक विजेत्यांच्या माध्यमातून देशाच्या संपूर्ण जनतेला दिसुन येईल.आज देशाचा प्रत्येक खेळाडू देशाची आन-बाण-शान आहे.कारण तो तिरंग्यासाठीच झुंज देत असतो.खेळाडू जेव्हा कोणतेही पदक जिंकतात तेव्हा मुख्यत्वे करून तिरंगा त्यांच्या हातात असतो व प्रत्येक खेळाडू तिरंग्याला सलाम करतो.मी आशा करतो की संपूर्ण खेळाडूंसाठी येणारे नवीन वर्ष आनंदमय व सुखमय राहिल.जय हिंद!

**********************

लेखक

**रमेश कृष्णराव लांजेवार**

**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)**

**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# कालचे महार आजचे बौद्ध कोरेगांव भिमा प्रेरणादायी इतिहासातून प्रेरणा घेतात काय ?.

भारत देश हा शोषण करणाऱ्या जाती धर्माचा आणि शोषण करू देणाऱ्या जाती धर्माचा देश आहे म्हणून ते दोघेही एकत्र राहून आपली उपजीविका चालवून जगतात.विशेष भांडवलदार आणि कामगार एकाच पक्षात,संघटनेत राहू शकतात, एकच मंदिरात पूजा करून देवाला आशीर्वाद मागतात.असा हा जगा वेगळा देश आहे. म्हणुनच पांच हजार वर्षा पूर्वी धर्मसत्ता देशात होती.पण एक हजार वर्षा पूर्वी ब्रिटिश लोकांनी मागासवर्गीय समाजाला शिक्षण,आरोग्य,आणि स्वरक्षण करण्याचा अधिकार दिला.त्यात महार समाजाचे लोक सर्वात पुढे आले त्यांनी आपला कौशल्य, शौर्य दाखवुन दिले होते.त्यामुळे ब्रिटिशानी लढाईत सर्वात पुढे त्यांना ठेवले.त्यांनीच ब्रिटिशाहाच्या बाजुने संघर्ष करून धर्मसत्तेचा माज असलेली पेशवाई गाडली. त्या लढाईला १८१८ ते २०२४ ला फक्त दोनशे सहा वर्ष पूर्ण होत आहेत.पण कालचे महार आजचे बौद्ध कोरेगांव भिमा प्रेरणादायी इतिहासातून प्रेरणा घेतात काय ?.

२०१८ला राज्यात व केंद्रात पेशव्यांच्या विचारांचे सरकार होते. त्यांच्या मनात दोनशे वर्षाची सल कायम होती.बहुजन समाज म्हणजेच मागासवर्गीय समाजसाठी,कोरेगांव भिमा प्रेरणादायी इतिहास आहे.तेच मनुवादी मानसिकता असणाऱ्या पेशव्यांच्या रक्ताच्या वारसदारांना मान्य नव्हता.तो पुसून काढण्याचा प्रयत्न त्यांनी त्याचं बहुजन समाजातील तरुणांना आंधळे बनवुन संघर्ष करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. त्यात ते पूर्णपणे फसले. पेशवाई पुन्हा इतर मागासवर्गीय आदिवासी यांना सोबत घेऊन लोकशाही मार्गाने सत्ताधारी झाली होती.नीती तीच होती, शल,कपट,कट कारस्थान खोटे बोल पण रेटून बोल. म्हणुन मोहन भागवत पांच हजार वर्षा पूर्वी आमची धर्मसत्ता होती.हे गर्वाने सांगतात.पण धर्माची होती की अधर्माची हे ते सांगत नाही. पेशवाईत फक्त महारांनाच अन्याय,अत्याचार सहन करावा लागत होता काय?.मराठे आणि इतर मागासवर्गीय समाजावर किती ही धार्मिक,सांस्कृतिक,मानसिक गुलाम बनविणारे रितीरिवाजाच्या नांवा खाली भयानक अन्याय अत्याचार झाले,तरी ते त्या विरोधात पेटून उठत नव्हते.म्हणूनच त्यांच्या जातीचा इतिहास नाही. जो अन्याय अत्याचारा विरोधात संघर्ष करतो त्यांची नोंद होते.म्हणूनच आज ही प्रत्येक आंदोलनाची सुरवात जयभिमवालेच करतात. कालचे महार आजचे बौद्ध कोरेगांव भिमा प्रेरणादायी इतिहासातून व्यक्तिगत प्रेरणा घेतात आणि संघर्षासाठी तयार होतात. त्यांनी ती व्यक्तिगत न घेत सामुदाईक व्यापक पणे घेतली तर राजकीय सत्ता परिवर्तन होऊ शकते.

भिमा कोरेगाव पासुन ७ की.मी वर वढु गाव आहे.येथेच छत्रपती संभाजी महाराज यांचा खुन झाला व त्यांचे तुकडे ह्या गावात फेकण्यात आले व दवंडी देऊन सांगितले कि जर कोणी हे गोळा केले तर त्याचे शीर कलम केले जाईल.आपल्या राजाची अशी दशा पाहुन एकही मराठा पुढे आला नाही. (एक मराठा लाख मराठा म्हणणाऱ्यांनी हा इतिहास जरूर वाचवा,शिवश्री अमोल मिटकरी,श्रीमंत कोकाटे यांच्या सारख्या नव्या दमाच्या विचारवंताचे व्याख्यान आपल्या गांवात किंवा शाळेत जरूर लावावे.) तेव्हा एका पहिलवानाला ही बातमी समजली तो धाडस करतो सर्व शरीराचे तुकडे जमा करुन स्वत:च्या घरी आणुन शिंप्याच्या हातापाया पडुन त्याला तयार करतो आपला राजा आहे त्यास असे नाही सोडू शकत.तो शिंपी ते तुकडे शिवतो पहिलवानाच धाडस पाहुन त्याचे नातलग ही मदतीला येतात असे ६२ जन जमा होतात. आणि त्या पहिलवानाच्या अंगणात छत्रपती संभाजी राजेंना अग्नि डाग स्वत: तो पहिलवान देतो. त्या पहिलवानाचे नाव होते गणपत महार आजचा जयभिमवाला होय एका महाराने छत्रपती संभाजी राजेंना अग्नि दिली.आज ही संभाजी राजेंची समाधी ही महार वाडयात आहे.(मराठा सेवा संघाच्या संभाजी ब्रिगेडमुळे हा इतिहास उजळात येत आहे.) ही बातमी मोगल व भटांना समजताच गणपत महार आणि बाकी मंडळीचे शीर कलम केले व महार जातीने दिवसा बाहेर पडण्यास बंदी घातली.त्यामुळे महारांच्या कमरेला झाडू आणि गळ्यात मडके टाकले अशी शिक्षा भटांनी सुनावली अशी कथा सोशल मीडियावर फिरते.पुढे ही बातमी पुण्यामध्येही पसरली लोक हया गणपत महाराला वंदन करु लागले. महाराचा देव झाला म्हणुन भट आणखी चिडले असे म्हणतात.

ब्रिटिशांना पुण्यामध्ये शिरने शक्य होत नव्हते. पेशवाईच्या विरुद्ध त्यांना यश मिळत नव्हते.हे सर्व महार सैनिक पहात होते.त्यांच्या सेनापतीचे नाव सिध्दनाक महार होते.तो इंग्रजां सोबत करार करतो तुम्हाला हे राज्य मिळुन देतो.तुम्ही आमच्या महार समाजाचे मडके झाडू मुक्त करा. सन्मानाने जगण्याचा आधिकार दया. इंग्रज त्याची अट मान्य करतात.हाच सिद्धनाक ५०० महार सोबत वढु येथील संभाजी राजेंच्या समाधीवर जाऊन दर्शन घेतो आणि म्हणतो राजे आम्ही तुमच्या खुनाचा बदला घेण्यास निघालो शक्ती दया, आशिर्वाद दया.असे म्हणून हे ५०० महार सोबत घेऊन २८००० पेशव्यांच्या सैनिकांना संपून टाकतात. तो दिवस होता १ जानेवारी म्हणुन हा शौर्य दिन म्हणून पाळला जातो. हाच कोरेगांव भिमा प्रेरणादायी इतिहास आहे.

मराठा मागासवर्गीय समाजाला हया इतिहासाची माहिती नसणे. हेच त्यांच्या मूळसमस्यांचे एक प्रमुख कारण आहे.पेशवाईत कोणीच सुख समाधानाने जगत नव्हते महार मराठे शूर होते म्हणूनच सरदार,सेनापती,वतनदार,देशमुख,पाटील होते.मराठा सेवा संघाच्या प्राध्यापक,विचारवंत अभ्यासकांनी हा इतिहास नव्याने लिहण्यास सुरवात केली आहे. हा इतिहास सर्वांनी जागृत होऊन मराठा मागासवर्गीय समाजाने वाचलाच पाहिजे. महारांच्या कंबरेला झाडू व गळ्यात मटके का आले?. देशात नव्हे तर जगात महार जातीचा शौर्यवान जात म्हणुन गौरव होत होता.हा इतिहास डॉ.भिमराव आंबेडकर यांनी इंग्लंडला वाचला तेव्हा पासुन ते एक जानेवारीला भिमा कोरेगांव येथील विजय स्तंभाला मानवंदना करण्यासाठी जात असत. हा महार जातीचा इतिहास आहे.आज कोणी तुम्ही महार लोक नाही सुधारणार किंवा आपल्या पायरीने वागा,महार जातीचे नांव घेऊन शिवीगाळ केली तर म्हणणाऱ्याला कायद्या नुसार केस करून जेलची हवा खावी लागेल.पण तेव्हा महार लोक लढाऊ,प्रामाणिक इनामदार,विश्वासु आणि मर्दानगी दाखवून शौर्य गाजविणारे होते असा ज्या महार जातीचा इतिहास आहे.त्यामुळेच त्यांच्या गळ्यात मटके आणि कंबरला झाडू आला. हा एक सत्य इतिहास नाही.

अहमदनगर जिल्ह्यातही घटना महारांच्या पोरांची मर्दानगी आणि शौर्य या मुळेच हत्याकांड घडल्याचा इतिहास आहे. म्हणून महारांच्या गळ्यात थुंकण्यासाठी मटकं आणि कमरेला झाडू कसा आला?. हा इतिहास वाचला पाहिजे. असे का घडले ? खरच महार समाज इतका घाणेरडा होता का?.महार समाजाचा इतिहास हा शौर्यांचा इतिहास आहे. त्यांच्या इतके साफ-स्वच्छ,प्रगत जात कोणतीच नव्हती.मग गळ्यात मडके आणि कमरेला झाडू अचानक कसे आले?. करीता ही हकीकत वाचा एकदा रघुनाथ पेशव्याची पत्नी आनंदाबाई पेशवे आपल्या दासींसोबत फिरायला निघाली. अगोदरच पेशवे घराणे स्त्री लंपट आणि पुरुष लंपट होते हे जगजाहीर होते. अचानक आनंदाबाईला मातीवर एका पुरुषाच्या पाऊल खुना दिसल्या.त्या पाऊल खुणा सर्व सामान्य माणसापेक्षा मोठ्या आणि आकर्षक होत्या.आनंदीबाई त्या पाऊल खुनावरच भाळली.तिने त्या पाऊल खुना कुणाच्या आहेत याचा शोध घ्यायला लावले. शोधातून समोर आले की त्या पाउल खुना लोहारकाम करणाऱ्या चंद्रा महारांच्या होत्या. त्यावेळेस महार समाज राजांचे शस्त्र बनविन्याचे आणि युद्धात लढाई करण्यात शौर्यवान होते. जेव्हा आनंदाबाई त्याला पाहायला गेली तेव्हा तो तलवार बनविण्याचे काम करत होता.त्यामुळे सहाजिकच त्याच्या कामामूळे त्याचे शरीर पिळदार झाले होते.उष्णतेमुळे अंगावर अगोदरच कमी कपडे होते. त्यातल्या त्यात तेव्हा महार समाजाचे लोक कस्तुरीयुक्त पान खात होते.ज्यातुन सर्वबाजूला सुगंध दरवळायचा. चंद्राचे पिळदार शरीर आणि कस्तुरीयुक्त पानाच्या तोंडून येणारया सुगंधाने तिची कामवासना जागृत झाली. तिने त्याला राजवाड्यावर बोलविले. तिच्या नजरेतील कामवासना चंद्राच्या वडिलांनी ओळखली. त्याच्या वडिलाने त्याला राजवाड्यावर जावू दिले नाही. राणीला हा अपमान वाटला.एक राणी जर चंद्रा सारख्या महारावर भाळत असेल तर तिच्या राज्यातील इतर साध्या स्त्रियांची काय स्थिती होत असेल. (नितीन आगे चे प्रकरण आठवा) हा तिला प्रश्न पडला?. चंद्रा वाड्यावर आला नाही म्हणून तो एक राणीचा अपमान होता. त्याचा सुड म्हणून रघुनाथ पेशवेच्या सहीने तिने राज्यात फर्मान काढला की. यानंतर महारांच्या गळ्यात मडके आणि कमरेला झाडू राहील.हे यासाठी की कोणत्याही महाराच्या तोंडुन कस्तुरीयुक्त पानाचा सुगंध कुणास जावू नये आणि ती थुंकी रस्त्यावर न टाकता मडक्यातच थुंकेल आणि कमरीला मातीवर सरपटणारा झाडू यासाठी की कोणत्याही



महाराच्या पाऊल खुणा मातीवरच्या पाहून जर राणी भाळू शकते तर इतर स्त्रियाही भाळतील म्हणून महारांच्या कमरेला झाडू लटकविण्यात आला. याचाच अर्थ असा होतो की महार गबाळ,अस्वछ नव्हतेच त्यांचा इतिहास हा अभिमानास्पद होता.जो ब्राम्हणांच्या कामवासनेने नासवला.हाच कोरेगांव भिमाचा प्रेरणादायी इतिहास आहे.

पेशवे तर सोडा परंतू महार समाजाच्या अंगी असलेले पराक्रम,शूरत्व व लढवय्यपणा इंग्रजांच्या ही पारखी नजरेतून सुटले नाही त्यांच्या ह्या गुणांचा पुरेपुर उपयोग पेशव्यांच्या विरोधात करून २८००० हजार पेशवाई सैनिक फक्त ५०० महार सैनिकांनी उभी कापून काढली.एक महार ५६ जणांना पुरुण उरत होता.पेशवे सैनिक न लढताच भांबावल्यासारखे सैरावैरा नुसतेच पळत सुटले. पेशवाई हारली आणि महारांनी ती पुर्णपणे नेस्तनाबूत करून टाकली.मग तेव्हा पासूनच एक म्हण पडली ती अशी कि तुझ्यासारखे असे छप्पन (५६) पाहिले. ह्या म्हणीचा खरा इतिहास हा आहे.

महारांच्या पराक्रमी शौर्य मुळे इंग्रज खूपच खुश झाले होते आणि ह्या खुशीच्या बदलल्यात महारांना इंग्रजांनी जमीनी बहाल केल्या. पण महारांनी जमिनी पेक्षा इतिहास कायम नांव राहावे आणि त्यांची आठवण राहावी म्हणून विजयस्तंभाची मांगणी केली.इंग्रजांनी ती मान्य करून विजयी स्तंभ बांधण्यात आला.त्या विजयी स्तंभावर ५०० महारांची नावे कोरण्यात आली.हाच तो १८१८ सालचा भीमाकोरेगावचा इतिहास डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी परदेशात शिक्षण घेतांना वाचला म्हणून त्यांनी आपल्या लोकांना सोबत घेऊन ह्या पराक्रमी शूरवीरांना वंदन करण्यासाठी १ जानेवारीला न चुकता जायाला लागले. म्हणुन आता लोक दरवर्षी जातात. कारण ते जर लढले नसते तर आपले अस्तित्व ही असून नसल्या सारखेच असते. महारांचा हा शुर व पराक्रमाचा इतिहास सोशल मिडियावर देशभर सध्या फिरत आहे.परंतु यातुन आजच्या बौद्ध झालेल्या महारानी कोणती प्रेरणा घेतली?. ६ डिसेंबर, १ जानेवारी,१४ एप्रिल,विजया दशमी धम्मचक्र परिवर्तन दीना सारखे ते लाखोंच्या संख्येने एकत्र येतात आणि जातात, पण विजयी होत नाही आजही खेड्यातील बौद्ध समाजाला मराठा पाटील इतर समाजाच्या राजकीय गुंडगर्दी मुळे गांव सोडून पळून जावे लागते, हे भिमाकोरेगांवला मानवंदना देण्याच्या लायकीचे नाहीत असेच म्हणावे लागेल.तेव्हा ते शत्रू बलाढ्य आणि मोठया संख्येने आहे हे माहित असुन सुध्दा जिद्दीने लढले. आज आम्ही संख्येने सर्वांना सोबत घेऊन ८५ टक्के होतो. हे माहित असुन ही पेशवाईच्या पालखीचे भोई होतो.म्हणजे कुठे तरी काही वैचारिक,स्वार्थीपणाची गडबड आहे.म्हणूनच विचारावे लागते कालचे महार आजचे बौद्ध कोरेगांव भिमा प्रेरणादायी इतिहासातून प्रेरणा घेतात काय ?.१ जानेवारी च्या शौर्यदिनाचा इतिहास वाचुन इतिहास घडवावा कि भिमा कोरेगांव ला जाऊन कुंटुंबिक सहल घडवीत राहणार?. तिथे ही वेगवेगळे बॅनर होडींग आणि स्टेज आणि वेगवेगळी भाषण!. मग कोणत्या तोंडाने आम्ही सांगणार आहोत की ५०० महार सैनिका कडून आम्ही प्रेरणा घेतली. खरच तुम्हाला कोरेगांव भिमा प्रेरणादायी इतिहास वाटतो का?.

मनोहर कुलकर्णी उर्फ संभाजी भिडे गुरुजी आणि एकबोटे यांनी सुपारी घेऊन २०० वर्षाची परंपरा बंद करण्याचे पूर्व नियोजन केले होते.त्याला पोलिसांनी व सरकारने योग्य ती मदत केली होती.इतिहास व वर्तमान काही असो,आता लाखो लोक दरवर्षी राज्यातुन नव्हे तर देशभरातून परदेशातून कोरेगाव भिमाच्या विजयी स्तंभाला मानवंदना देण्यासाठी मोठ्या संख्येने यायला लागले. कारण कोरेगांव भिमा प्रेरणादायी इतिहास जगाला माहिती झाला. आजच्या पिढीला माहिती असणे आवश्यक आहे.कालचे महार आजचे बौद्ध कोरेगांव भिमा प्रेरणादायी इतिहासातून प्रेरणा घेतात काय ?.हे पण समाजातील सत्य परिस्थिति पाहिल्यावर विचारावे लागते. कारण लाखों लोक शरीराने एक दिवस एकत्र येतात.मनाने नाही. मनाने एकत्र आले तर पेशवाई पुन्हा डोके वर काढणार नाही. म्हणूनच कालचे महार आजचे बौद्ध कोरेगांव भिमा प्रेरणादायी इतिहासातून प्रेरणा घ्यावी.तीच खरी मानवंदना असेल.

********************

**सागर रामभाऊ तायडे**
**-९९२०४०३८५९,**
**भांडुप,मुंबई.**

# भीमा कोरेगाव संघर्षाचा त्रिकोण सरकार,पोलीस आणि भिम सैनिक.

पेशवाईचा वैचारिक वारसदार गृहमंत्री,त्याचे सरकार आदेश देणार. पोलीस त्याची अंमलबजावणी करणार आणि भिम सैनिक संघर्ष करणार सध्या आपल्या देशात हेच चालू आहे.त्यात कोणालाच कोणाची सामाजिक बांधिलकी नाही.सर्वच सरकारी खाते हे खाते आहेत. सरकारी कर्मचारी अधिकारी हे राजकीय नेत्यांची गुलामी स्वीकारून देशातील नागरिकांचे आर्थिक शोषण करीत असतात. सरकार म्हणजे कोण राजकीय पक्षांचे सत्ताधारी नेते भांडवलदारांच्या फायद्यासाठी योजना,बिल बनविणार त्यांची अंमलबजावणी कर्मचारी अधिकारी पोलीस करणार. सरकारच्या धोरणाला विरोध कोण करणार?.कामगार, शेतकरी,ग्राहक म्हणजेच नागरिक आणि आम्ही भिम सैनिक मोर्चे आंदोलने करणार पोलीस त्यांच्यावर बळाचा वापर करणार,आणि आदेशाचे पालन करणार.प्रत्येक नेता आणि शासकीय कर्मचारी अधिकारी नागरिकांचे वेगवेगळा पद्धतीने आर्थिक शोषण करणार आणि सांगणार वरून सरकारचा आदेश आहे.आम्ही काय करणार?. सरकारच्या कोणत्याही खात्यात जा चिरीमिरी दिल्या शिवाय काम होत नाही. नाहीतर एक नाही अनेक चुका काढल्या जातात. मग कार्यालयात चकरा माराव्या लागतात. त्यामुळे एक तर रोजगार बुडतो आणि येण्या जाण्याचा प्रवास खर्च चहा पाणी जेवणाचा खर्च हा आलाच.तो करण्यापेक्षा चिरीमिरी देणेच सोयीस्कर परवडते.हाच सर्व नागरिकांना सरकारी खात्याचा अनुभव आला असेल.म्हणूनच सरकारी खाते हे खातेच असते. त्यांचे मालक सरकारी कर्मचारी अधिकारी असतात.

एकटा दुकटा नागरिक संघर्ष करू शकत नाही.पण एक भिम सैनिक मात्र परिणामाची पर्वा न करता संघर्ष करण्यासाठी नेहमीच उभा राहतो आणि बघता बघता हजारो भिम सैनिक त्याला गांव ते तालुका जिल्हा म्हणजेच राज्यभर समर्थन देण्यासाठी उभे राहतात.मग ते एकाची समस्या राहत नाही तर समाजाची समस्या होते.मग त्याला समाजाचे चळवळीचे आंदोलन नांव दिल्या जाते. त्यासाठी प्रत्येक खात्यातील लाभार्थींची एकजूट म्हणजेच संघटना असायला पाहिजे.आणि ती कोणत्याही राजकीय पक्षाच्या दबावाखाली नसावी.स्वतंत्र विचारांची असावी.भीमा कोरेगाव च्या विजय स्तंभा वरील जागेची, जमिनीची अशीच लढाई सुरू आहे.ती कोण्या एक आजच्या दादाभाऊ अभंग ची किंवा पूर्वीच्या सुदाम पवार ची नव्हती.पण राजकीय पक्षाच्या गटबाजी,दलाली व लाचारीमुळे ती वेळोवेळी फुटबॉल सारखी उडविला गेली आहे.१८१८ ते १९२७ पर्यंत ती कोणाला माहिती नव्हती.विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तो शोधून काढला तेव्हा पासून त्यांना मानणारा भिमसैनिक,अनुयायी दरवर्षी हजारो च्या संख्येने भीमा कोरेगाव विजय स्तंभावर येत आहे.२०१८ नंतर

दरवर्षी आम्ही ५ /६ सहा डिसेंबर ला शिवाजी पार्क मैदानात विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमित्ताने राज्य सरकारने व महानगरपालिकेने काय व्यवस्था केली यांची पाहणी करून चर्चा करतो.कागदावर नकाशा द्वारे दाखविलेलं जाते. त्यांची हजारो लाखों हँडबिल पोस्टर हातो हात वाटली जातात. प्रत्यक्षात ते आहे काय पाहिलं तर कुठंच काही दिसत नाही. आणि संबंधित अधिकारी यांना भेटू विचारले तर आपल्या माणसाला काम दिले आहे. तुमच्या समोर कॉल करून त्या ठेकेदाराला दम देतो.त्यांचा नंबर मांगीतला तर तो समितीच्या माणसाचा माणूस असतो किंवा कोणत्या तरी नेत्याचा अधिकाऱ्यांचा माणूस असतो.होऊन जाईल आम्ही करतो असे उत्तर ठरलेले असते.महानगरपालिका,राज्य सरकार आणि पोलिस सर्वच मागासवर्गीय अधिकारी कर्मचारी असतात.मग एकजुठीने एक मताने कोणते ही काम होत नाही. ज्यांनी आवाज उचलला त्याला चिरीमिरी देऊन आवाज बंद केल्या जातो. यावर माझे आणि माझ्या वकील मुलाचे नेहमीच वाद विवाद होत असतात. एवढे जिगरबाज कार्यकर्ते नेते असतांना योग्य त्या प्रमाणे नियोजन का होत नाही. सर्वच अधिकारी भ्रष्ट नाही किंवा कार्यकर्ते नेते भ्रष्ट नाहीत. पण तडजोडीचे राजकारण इमानदार अधिकारी कर्मचारी कार्यकर्ते नेते यांना करावे लागते.त्यांचे उत्तम उदाहरण म्हणजे दादर परिसरात बॅनर बाजी करणाऱ्या आणि स्टॉल लावणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांचे नेत्यांचे देता



येईल.अनेक स्टॉलवर एकवेळ भोजन,बिस्किट,काही साहित्य वाटून फक्त उद्घाटन करून फोटो काढल्या जातात.नंतर त्यात काहीच होत नाही. असा लोकांना एवढी बॅनरबाजी करण्याची गरज का पडते?.यासाठी यांचे उद्योग धंदे उत्पन्नाचे साधने आहेत काय?.मग यासाठी लागणारा खर्च कुठून येतो.याचे सरळ उत्तर आहे. अधिकारी आणि ठेकेदाराकडून हे बॅनरबाजी करून घेतली जाते. त्याबदल्यात कागदावर नकाशा द्वारे दाखविलेलं जाते. त्या विरोधात बोलायचे नाही.यावर्षी ६ डिसेंबर २०२३ ला सर्व बुक स्टॉल समोर रेड कारपेट टाकल्या जाईल. धूल बिलकुल उडणार नाही अनुयायांना त्रास होणार नाही असे कोणी कोणी जाहीरपणे सांगितले होते.कागदावर पण लिहून जाहीर केले होते.आम्ही ४/५ डिसेंबर ला अनेक अधिकाऱ्यांना विचारले उद्या सकाळी तुम्हाला दिसेल रात्रीच काम होऊन जाईल असे सांगितले गेले.पण ६ डिसेंबर ला कुठेच रेड कारपेट दिसले नाही. एकमेव युवक वंचित बहुजन आघाडी ने त्या विरोधात जाहीरपणे पत्रक काढून निषेध नोंदविला.बाकी अनेकानी आपसात चर्चा केल्या महापरिनिर्वाण दिनासाठी राज्य सरकारचा आणि महानगरपालिका यांचा किती निधी येतो आणि खर्च होतो.ठोस उत्तर कोणीच कोणाला देत नाही आणि विचारत नाही कारण काय?. संघर्षाचा त्रिकोण सरकार,पोलीस आणि भिम सैनिक. मी भीमा कोरेगाव ला दरवर्षी चार दिवस अगोदर जाऊन येतो.नियोजन कसे आहे. संबधित कार्यकर्ते नेते,अधिकारी यांच्या बरोबर चर्चा करून माहिती घेतो.कारण मागितल्याने मिळत नाही आणि संघर्षा शिवाय पर्याय नाही संघटीत होऊन संघर्ष केला तर यशस्वी होता येतो. म्हणूनच संघर्षाचा त्रिकोण सरकार,पोलीस आणि भिम सैनिक संघर्ष पत्र व्यवहार करून टाळावा.नसेल तर शक्ती प्रदर्शन आवश्यक आहेच. कोरेगाव भीमा विजयस्तंभ (१ जानेवारी २०२४) मानवंदना सोहळा नियोजनाची बैठक मान. जिल्हाधिकारी साहेबांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.सदर बैठक हे विजय स्तंभ भीमा कोरेगाव नियोजनासाठी होती. पण अनेक कार्यकर्त्यांनी बार्टीच्या निधी बाबत आणि विद्यार्थ्याच्या शिशुवृतीच्या निधी वाटपा संदर्भात प्रश्न विचारून सदर बैठकीत काही कार्यकर्त्यांनी आक्रमकपणे त्यांची भूमिका मांडली व प्रत्येक जण भूमिका मांडत असताना गोंधळ झाला व या गोंधळातच बैठक संपली.भीमा कोरेगाव संघर्षाचा त्रिकोण सरकार,पोलीस आणि भिम सैनिक थांबला नाही.

कोरेगाव भीमा विजयस्तंभ हा आपल्या सर्वांसाठी आस्थेचा श्रद्धेचा प्रेरणादायी लक्षवेधी भावनिक आहे. देशभरातून लाखों लोक दरवर्षी अनेक वर्षांपासून विजय स्तंभाला मानवंदना देण्यासाठी भीमा कोरेगाव ला येत असतात.त्यांना कोणी आमंत्रण निमंत्रण देत नाही. त्यासाठी कोणते ही हँडबिल,पोस्टर काढल्या जात नाही. इथे पिण्याचे पाणी मिळेल काय यांची कोणी अपेक्षा सुद्धा ठेवत नाही.पिण्याचे पानी जेवण सर्व सोयीने लोक येत असतात. शासनाकडून कोणती सुविधा मिळावी अशी कोणती ही अपेक्षा न ठेवता लाखों लोक आपल्या सोयीने आणि हिंमतीने भीमा कोरेगावला येतात.२०१८ ला दोनशे वर्ष झाले म्हणून लोक आले असता १ जानेवारी २०१८ ला मनोहर भिडे यांच्या जगदंब जॉकीट घातलेल्या गांडु तरुणांनी शेतात लपून दगड फेक करून जो जीवघेणा हल्ला लोकावर केला होता. त्या नंतर ३ जानेवारी २०१८ ला महाराष्ट्र बंद पाडला होता त्यांची दखल जागतिक पातळीवरील चॅनल मिडियाने घेतली. सोशल मिडियामुळे भीमा कोरेगाव चा इतिहास घरा घरात पोचला बहुसंख्य मराठा, ओबीसी यांना हा इतिहास माहिती नव्हता.ते पण आता भीमा कोरेगाव ला मोठ्या संख्येने येत आहेत.ती संख्या बघून आता सर्वांचे डोळे फिरत आहेत.पेशवा सरकार त्यांना २०१८ झाली रोखण्यास असमर्थ ठरले म्हणूनच आता ते नवीन पद्धतीने रोखणीचे षड्यंत्र करीत आहेत.ते म्हणजे पांच सात किलोमीटर वर गाडी पार्किंग करण्याचे व्यवस्था.त्यामुळे वयोवृद्ध जेष्ट भिम सैनिक महिला या त्रासाला वैतागून येणे टाळतील अशी अपेक्षा पेशवा सरकारची आणि अधिकारी वर्गाची मानसिकता झाली आहे.त्यांच्या आदेशाचे पालन अधिकाऱ्यांना करावी लागत आहे.इतिहास वाचला की इतिहास घडविता येतो भीमा कोरेगाव हा असाच संग्राम आहे. १८१८ पेशवाईचा झालेला पराभव आज पेशवाईचा राजकीय वैचारिक वारसा सांगणाऱ्यांच्या जिवारी लागत आहे. मग ते विजय स्तंभाला निधी उपलब्ध करून देतील ही अपेक्षा चुकीची आहे. संविधान असे सांगते की एखाद्याला आधार देताना असा आधार द्यावा की,त्याला त्याची 'जाणीव' ही होऊ नये,आणि.'उणीव' ही राहू नये !. विजयस्तंभ परिसरातून ३७ वर्षाची परंपरा असलेल्या अभिवादन सभा चार वर्षांपूर्वी २०१८ ला बाहेर काढल्या व आत्ता मानवंदना रॅलीने त्रास होतो असे सांगून आंबेडकरी जनतेच्या रॅली बंद करण्याचा डाव पेशवा सरकार अधिकाऱ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेऊन खेळत आहे. पारंपारिक मानवंदना व अभिवादनाची सभा परंपरा मोडीत काढण्याचा आपल्याच काही बांधवांचा हाताशी धरून हा प्रयत्न केल्या जात आहे.परंतु आंबेडकरी जनतेला हे काही नवीन नाही.आपसात किती ही मतभेद असले तरी लोक मान अपमान बाजूला ठेऊन दीक्षाभूमी नागपूर,चैत्याभूमी दादर मुंबई,चवदार तळे महाड आणि विजय स्तंभ भीमा कोरेगाव ला लाखों च्या संख्येने येत असतात.व एक साथ मानवंदना देतात. कायदा सुव्यवस्था ठेवण्याच्या नांवाखाली दरवर्षी मनुवादी मानसिकता असणारे राज्यकर्ते आणि प्रशासकीय अधिकारी यांना कसा त्रास देऊन रोखता येईल यांचेच नियोजन करीत असते. त्याला साथ देण्यासाठी दर पांच वर्षाने नवीन कार्यकर्ते नेते तयार केले जातात. जून अनुभवी मागे पडतात.असे मला २००७ ला भीमा कोरेगाव विजय स्तंभाची सुरवात करणारे आंबेडकरी चळवळीतील जेष्ट नेते सुदाम पवार यांनी मुलाखत देतांना सांगितले होते. विजय स्तंभाची जागा बाजूच्या शेत जमीन वरील अतिक्रमन यांच्या विरोधात सनद शिर मार्गाने पत्रव्यवहार आणि रस्त्यावरील संघर्षाची सुरवात त्यांनी केली होती.आज त्यांचे वे ९३ आहे. सणसवाडीला तालुका शिरूर जिल्हा पुणे येथे त्यांचे निवास स्थान आणि बुद्धिस्ट मुवहमेन्ट मुव्ह मेंट सेंटर (ट्रस्ट) संचालित नालंदा बुद्ध विहार आहे.तिथे नियमितपणे धम्म शिबिर सामाजिक कार्यक्रम होत असतात.आणि हजारो लोक तिथे दरवर्षी भोजन दान घेतात. जिवावर उद्धार होऊन त्यांनी अनेक जन आंदोलन केली आहेत. त्यांचे योगदान कधीच विसरता येणार नाही.पण राजकीय पक्षाच्या गटबाजी,दलाली व लाचारीमुळे ती वेळोवेळी फुटबॉल सारखी उडविला जात आहे.५०० महार सैनिकांची एकजुट होऊन २८००० हजार पेशवा सैनिकांच्या विरोधात जो संघर्ष केला आणि विजय मिळविला त्याचा कोणता आदर्श भीमा कोरेगाव ला येणारे घेतात हा प्रश्न मला दरवर्षी पडतो.त्या वर मी दरवर्षी हे लिहतो.आपसातली गटबाजी मी मोठा की तू मोठा ही संपत नाही. म्हणूनच भीमा कोरेगाव विजय स्तंभाच्या जमिनीचा कोर्टाने दिलेला आदेश त्याची अंमलबजावणी करतांना अनेक अडचणी निर्माण केल्या जातात. डिसेंबर जानेवारीत सर्वांच्या अंगातील रक्त भीमा कोरेगाव मध्ये लढलेल्या महरांचे होते. बाकीच्या वेळी तिथे काय चालले त्यांना काही घेणे देणे नसते.म्हणूनच भीमा कोरेगाव संघर्षाचा त्रिकोण सरकार,पोलीस आणि भिम सैनिक हा थांबत नाही.भीमा कोरेगाव विजय स्तंभाला मानवंदना देण्यासाठी येणाऱ्या प्रत्येकानी याचे आत्मचिंतन करावे हीच सर्वांना कळकळीची विनंती. भीमा कोरेगाव संघर्षातील शहिदांना मानाचा मुजरा.

**************

**सागर रामभाऊ तायडे**
**,९९२०४०३८५९,**
**भांडूप मुंबई.**

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुजन कर्मचारी जयंती उत्सव समितीद्वारा भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त अभिवादन

लातूर दि.०१ :– डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुजन कर्मचारी जयंती उत्सव समितीद्वारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क, लातूर येथे भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी सर्वप्रथम महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पदाधिकाऱ्यांनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. त्यानंतर विजयस्तंभाला अभिवादन केले. यावेळी कोषाध्यक्ष तथा प्रसिद्धी प्रमुख प्राचार्य डॉ. संजय गवई, माजी उपप्राचार्य प्रा. कल्याण कांबळे, प्रा. प्रशांत उघाडे आणि विनायक बोरीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सर्वांनी भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा देऊन शौर्य दिन विजयी होवो अशा घोषणाही देण्यात आल्या.



## डॉ. ओमप्रकाश शेटे यांचा आज सत्कार ..

लातूर, दि. १ आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख तथा केंद्रीय आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालयाचे सहाय्यक सचिव मराठवाड्याचे सुपुत्र तथा तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष कार्य अधिकारी व माजी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष प्रमुख डॉ. ओमप्रकाश सदाशिव शेटे यांचा जाहिर सत्कार व गुणगौरव सोहळा येथील गंधर्व हॉटेलच्या फंक्शन हॉल मध्ये सोमवार, १ जानेवारी २०२४ रोजी आयोजित करण्यात आला आहे. लातूर शहरातील सर्व नागरीकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन आम्ही सर्वजण लातूरकर, लिंगायत समाज, सर्व सामाजिक संघटना, शिव बसव भक्त, मित्र मंडळ, बचत गट, महिला मंडळ व डॉ ओमभैय्या शेटे फॅन्स यांचे वतीने ड. सौ. शितल पाटील, श्री संजय पाटील, प्रा. संगमेश्वर पानगावे, चंद्रशेखर कत्ते, विश्वनाथ निगुडगे, उमाकांत कोरे, बसवंत भरडे, लताताई मुद्दे, स्मिता खानापूरे, दगडू मिटकरी, प्रा. सुदर्शन बिरादार, बालाजी पिंपळे, शिवा चौरे, महेश कोळ्ळे, प्रा. रामलिंग बिडवे, चंद्रकांत बिराजदार, बसवेश्वर रेकुळगे, प्रकाश कोरे, ड सुरज विभूते, सतिश पेद्दे, अविनाश पाटील बोळेगावे, विजय शेटे, शिवलिंग जेवळे, शिवहार वाडकर, जगन्नाथ कोळंबे, पुष्कराज खुब्बा, बसवेश्वर धाराशिवे, गुरूनाथ मगे, अविनाश रेशमे, रामेश्वर पाटील, लक्ष्मीकांत बावगे, डॉ. अरविंद भातांब्रे, सोनू डगवाले, ओमप्रकाश झुरळे, विश्वनाथ खोबरे, ड महेश बामणकर, ड दयानंद मिटकरी, डॉ. शिवाजी काळगे, ड किशोर राजूरे, डॉ. संजय शिवपूजे, डॉ. राजेश दरडे, डॉ. ओमप्रकाश भोसले, संग्राम जमालपूरे, विठ्ठल आवाळे, प्रा. मलशेट्टे, मिनाक्षी शेटे, शिवा गुजर, लक्ष्मण मुकडे, मनोज राघो, रवी बिरादार,



सदाशिव हसनाबादे, मनिषा बोळशेटे, योगेश कारंजे, सुनिल हेंगणे, प्रा. राजेश विभूते, राजकुमार कत्ते, दयानंद पाटील, ड निलेश करमुडी, नागेश कानडे, प्रशांत बोळेगावकर, ओमप्रकाश शेटकार, संगमेश्वर स्वामी, गुलाब पाटील, भालचंद्र येडवे, विकास गाढवे, सोमनाथ स्वामी, श्रीधर स्वामी, श्रीकांत हिरेमठ, शिवाप्पा कोरके, राजू उटगे, ओम धरणे, निलेश पेद्दे, बालाजी लातूरे, शिवराज एकलिंगे, मनोज खेळगे, विरभद्र कमलापूरे, होनमाळे, पत्की, इत्यादींनी केले आहे.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात बारावी विज्ञान मार्गदर्शन कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

लातूर दि. ०१ महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात दि. २९ व ३० डिसेंबर २०२३ या दोन दिवशी बारावी विज्ञान वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी बारावी बोर्डाची प्रश्नपत्रिका कशी सोडवावी? याविषयी कार्यशाळा घेण्यात आली.या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे संचालक अशोक अप्पा उपासे उपस्थित हे होते. यावेळी विचार मंचावर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांना उपस्थितांनी पुष्पहार घालून अभिवादन केले.यावेळी उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे प्रास्ताविक करताना म्हणाले की, विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या कालावधीमध्ये जास्तीचा ताण–तणाव घेऊ नये. वेळेचा सदुपयोग करावा. सातत्यपूर्ण अभ्यास करावा व जास्तीत जास्त बोर्डाच्या प्रश्नपत्रिका सोडवाव्यात. या कार्यशाळेत बोलताना महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये आई–वडिलांबरोबर शिक्षकांचा फार मोठा सहभाग असतो. सर्व विद्यार्थ्यांनी अभ्यासाचे नियोजन करावे व नियोजनाप्रमाणे अभ्यास करून गुणवत्तेचा आलेख चढत्या क्रमाने ठेवावा.अध्यक्षीय समारोप कर ताना अशोक आप्पा उपासे म्हणाले की, विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास होण्यासाठी अशा कार्यशाळेचे आयोजन होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी गुणात्मक विकास करून स्वतःचा, आई–वडिलांचा, महाविद्यालयाचा व संस्थेचा नाव लौकिक करावा असे प्रतिपादन त्यांनी केले.या कार्यशाळेत प्रा. सूर्यवंशी के. आर. (गणित), डॉ. गुणवंत बिरादार (पशुविज्ञान व तंत्रज्ञान), प्रा. आनंद खरपडे (डेरी सायन्स), प्रा. पटने वाय. बी. (क्रॉप सायन्स). डॉ. टी. घन:श्याम (हिंदी), प्रा. सोनोने रवींद्र (पाली), प्रा. दुडीले व्यंकट (मराठी), प्रा. पाटील व्ही. सी. (भौतिकशास्त्र), प्रा. पांढरे जी. एल. (रसायनशास्त्र), प्रा. पानगावे संगमेश्वर (वनस्पतीशास्त्र)., प्रा. माळी श्रीकांत (प्राणीशास्त्र), प्रा. सुप्रिया बिराजदार (इलेक्ट्रॉनिक्स), प्रा. लखादिवे संपदा (इंग्रजी) यांनी विद्यार्थ्यांना सखोल व अभ्यासपूर्ण मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.या कार्यशाळेत बारावी विज्ञान वर्गातील एकूण साडेतीनशे विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य प्रा. संजय पवार यांनी केले व आभार कार्यालयीन प्रमुख नामदेव बेंदरगे यांनी मानले.या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी सुरेश येरुळे, जगन्नाथ येंचवाड, संतोष येंचवाड, रघु शिंदे केशव घंटे, अशोक शिंदे, गोपाळ तिरमले, शुभम बिरादार, राजाभाऊ बोडके, लोंढे मावशी, सय्यद जलील यांनी परिश्रम घेतले.



## लातूर जिल्ह्यात ११ लाख २७ हजार लोकांना मिळणार आयुष्मान कार्ड,आतापर्यंत फक्त २८ टक्के लोकांनीच काढून घेतले कार्ड

लातूर दि. १ (जिमाका) : जिल्ह्यातील ११ लाख २७ लाख एवढ्या पात्रताधारक लाभार्थ्यांना आयुष्मान कार्ड मिळणार असून आतापर्यंत फक्त २८ टक्के लोकांनी हे कार्ड काढून घेतले असून या कार्डधारकांना विविध ३० प्रकारच्या रोगांवर आयुष्मान भारत मिशन अंतर्गत उपचार होणार आहेत. जिल्हा प्रशासनाने मिशन मोडवर जनतेची आयुष्मान कार्ड काढून घ्यावीत. येत्या काही महिन्यात आयुष्मान भारत मिशन मध्ये मोठे बदल अपेक्षित असून आयुष्मान कार्डचे महत्व ए.टी.एम. कार्डसारखे वाढेल, असे प्रतिपादन आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी केले. लातूर जिल्ह्यातील आयुष्मान भारत योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेच्या जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत डॉ. शेटे बोलत होते. आमदार अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर –घुगे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, नगरपालिका प्रशासनाचे सह आयुक्त रामदास कोकरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच. व्ही. वडगावे यांच्यासह खाजगी हॉस्पिटलचे डॉक्टर, विविध विभागाचे प्रमुख यावेळी उपस्थित होते. आयुष्मान भारत योजनेत लातूर जिल्ह्यात मिशन मोडवर काम व्हावे, म्हणून जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती असून त्याला गती देण्यात येणार आहे. महानगरपालिका, नगर परिषद, नगर पंचायत विभागात आयुष्मान भारत कार्ड काढून घेण्यासाठी नगरपालिका प्रशासन विभागाचे सहआयुक्त रामदास कोकरे हे नोडल अधिकारी असणार आहेत. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत सद्यस्थितीत जिल्ह्यातील १४ हॉस्पिटल असून ती संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. सुमारे ३० विविध आजार आयुष्मान भारत योजनेत समाविष्ट असून त्याच्या पॅकेजसह यात अनेक बदल होणार आहेत. नागरिकांना मिळालेले आयुष्मान कार्ड हे भविष्यात अत्यंत महत्वपूर्ण ठरणार असून बँकेचे एटीएम कार्ड जसे तुमच्या आर्थिक व्यवहारासाठी महत्वाचे ठरते तसेच हे तुमच्या आरोग्यासाठी हे कार्ड महत्वाचे ठरणार असल्याची माहिती डॉ. शेटे यांनी यावेळी दिली. या योजनेत हॉस्पिटल समाविष्ट असतील त्यांची यादी प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालयात लावली जाणार असून ग्रामसभेतही हे हॉस्पिटल आणि कोणकोणते रोग, व्याधीचा उपचार यात होतो हे वाचून दाखविण्याचेही या बैठकीत ठरले. जिल्ह्यातील महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत योजनेचा आढावा घेण्यात आला, यानंतर दोन महिन्यांनी या प्रगतीचा आढावा घेतला जाणार असल्याची माहितीही डॉ. शेटे यांनी यावेळी दिली.

## विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील जेवणात अळ्या आढळल्याचे वृत्त चुकीचे

लातूर दि. १ (जिमाका) : विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील जेवणात जिवंत अळ्या आढळल्याचे वृत्तविषयक संकेतस्थळावर प्रसिद्ध आले आहे. हे वृत्त चुकीचे असून असा कोणताही प्रकार घडला नसल्याचे स्पष्टीकरण विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. समीर जोशी यांनी दिले आहे. जेवणात जिवंत अळ्या आढळल्याबाबतच्या वृत्ताची पडताळणी केली असता, ही घटना इतर जिल्ह्यातील असून लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात अशी कोणतीही घटना घडलेली नाही, असे डॉ. जोशी यांनी कळविले आहे.

# नववर्षानिमित्त लातूरमध्ये रात्रभर पोलिसांचा चोख बंदोबस्त; मद्यपी चालकांवर कारवाई.

### कोंबिंग ऑपरेशन व ठिकठिकाणी नाकाबंदीचे आयोजन. ५२ अधिकारी व ५०० पोलीस अमलदार २०० होमगार्डचा तगडा बंदोबस्त.

लातूर :– मावळत्या वर्षाला निरोप अन नववर्षाचे स्वागत रविवारी (ता.३१) मध्यरात्रीला शहरात जल्लोषात आणि दणक्यात करण्यात आले. रविवारी शहरासह जिल्ह्यात पार्ट्यांची रंगत वाढली.

सरत्या वर्षाला निरोप देताना मद्यसेवनासह नियम मोडणाऱ्यांचा लातूर पोलिसांकडून कार्यवाही करण्यात आली.जागोजागी नाकाबंदी व संपूर्ण जिल्ह्यात कोंबिंग ऑपरेशनचे आयोजन करण्यात आले होते. रात्री उशिरा सुरू झालेली ही तपासणी पहाटेपर्यंत कायम होती.

अतिमद्यसेवन केलेल्या वाहनचालकांना थेट ड्रंक अँड ड्राइव्ह च्या केसेस केल्याने अनेकांची नशाच उतरली.

कोंबिंग ऑपरेशन दरम्यान जिल्ह्यात एकूण ४० ठिकाणी नाकाबंदी लावण्यात आली होती.

रविवारी (ता.३१) पहाटेपर्यंत १,६५८ वाहनांची तपासणी करण्यात आली.

७८ मद्यधुंदावस्थेतील वाहनचालकांवर कारवाई केली गेली.











११२४ वाहन चालकावर मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी मोटार वाहन कायद्यान्वये खटले दाखल करण्यात आले आहेत. तसेच ओवर स्पीड चे ५० केसेस करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील ७२ हॉटेल व लॉज चेक करण्यात आले. विविध गुन्ह्यात फरार व पाहिजे असलेल्या ४४ आरोपींना तपासण्यात आले.

दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने दबा धरून बसलेल्या ३ इसमावर कलम १२२ अन्वये कारवाई करण्यात आली.

कोंबिंग ऑपरेशन व नववर्ष बंदोबस्तासाठी लातूर जिल्ह्यातील एकूण १३ वरिष्ठ अधिकारी तसेच ५२ पोलीस अधिकारी ५०० पोलीस अमलदारसह, २०० होमगार्ड, यांचा प्रचंड मोठा बंदोबस्त लावण्यात आला होता. शिवाय स्थानिक गुन्हे शाखा, ११२ डायल, चार्ली मोटरसायकल पेट्रोलिंग, दामिनी पथकची गस्त सुरू होती. मद्यपी आणि रात्री गोंधळ घालणाऱ्यांना गुन्हे शाखेच्या पथकांनी अटकाव केला. रात्री आठपासून शहरात सर्वत्र नाकाबंदी करण्यात आली. प्रत्येक चारचाकी आणि संशयित दुचाकीस्वारांची तपासणी करण्यात आली. अतिप्रमाणात मद्यप्राशन केल्याचा संशय आलेल्या व्यक्तीं वर 'ड्रंक अँड ड्राइव्ह'च्या कारवाई करण्यात आली

पोलीस अधीक्षकाकडून भेटी.

पोलिस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांनी रात्री विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नाकाबंदीच्या पॉइंटवर प्रत्यक्ष भेट देत पाहणी करून मार्गदर्शन व सूचना केल्या. तसेच लातूर पोलिसांनी रात्रभर चोख बंदोबस्त केल्यामुळे कोणत्याही प्रकारचे अनुचित व अप्रिय घटना घडली नसून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी वारलेस वरून बंदोबस्तावरील सर्व पोलीस अधिकारी व अमलदारांचे कौतुक करून नववर्षांच्या शुभेच्छा दिल्या.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE